## छबू

*('बहादूर थापा आणि इतर कविता (प. आ. २०१५) मधून साभार)*

१

छबू यायचीस तू दुकानी
तुझी पोलकी शिवून घ्यायला
नि तुझ्यामुळे तुझ्या जोडीदारनीदेखील...
पण त्या साऱ्या गर्दीत तूच होती ध्यानात राहणारी
साऱ्याच होत्या सुंदर सुस्वरूप
पण मन तुझेच होते निर्मळ खूप

तू होतीस सावळी
देवीच्या वणांनी भरलेला चेहरा
पण तोंडात मिठ्ठास, तशीच मायाळू वागणुकीला
तमाशातल्या फडातली सहनर्तिकए
पण आता
हौसा-मंजुळाचा फड मोडल्यापास्नं
घरीच राहिलेली
तू राहायची त्या खोलीचं भाडं थकलतं
जुन्या चंदीवर थोडंबहुत चाल्लंतं

२

तुला यायच्या नाचाच्या नवनव्या स्टेप्स
नव्या पोरींना शिकवायची
नायकिणीच्या गैरहजेरीत
तुला नाही मिळाली कधी पूर्ण संधी
तू सहनर्तिकाच
तरीही रंगबाजी लावणीत पुढच्या मुली
चुकू लागल्या की तू चुचकरायची
मन थाऱ्यावर नसलेली एखादी
नुसतेच हातवारे करीत राह्यची
तू ध्यानी आणून द्यायची
होऊ द्यायची नाही गाण्याचा इस्कोट
बांधीत राह्यची गाण्याची मोट

तमाशा चालू होता तेव्हा खेळ संपल्यावर
तमाशा प्याक होऊन गाडीत पडेपर्यंत
तुझी राह्यची नजर खाली काही राहिलं नाही ना यावर
तुझा विरोध होता चिरा उतरविण्याच्या प्रथांना
तू हुसकलेस कनातीत भटकणारे भातू
तुझा विरोध खासगी बैठक लावण्याला
नि कुणी चवलीपावलीचे व्हायला

वाजापापासून कनात बांधणाऱ्यापर्यंत
चालायचा तुझा शब्द
जत्रा-खेत्राच्या दिवसांत तू जायची
दोन-दोन महिने दौऱ्यावर

३

तुला नव्हता मिळाला मनाजोगता जोडीदार
एकट्याच मैनसारखी राह्यची त्या पत्र्यात
एक मांजर होतं रोज अर्धा लिटर दूध पिणारं
नि शेवटी एक भालू कुत्रा - जो खायचा
दिवसात तीन भाकरी
स्वतःच्या पोटाला चिमटा काढून त्यांना खिलवण्याचा
अनजाना प्रयोग पाहून थक्क व्हायचे लोक

दर दिवाळी राखी पोर्णिमेला तू सुटायची
ओवाळीत साऱ्या शेजार-पाजारच्यांना
तुला राह्यचं होतं तिथं खोलीत एकटीनं
जोडायचं होतं नातं जगाशी -
आपल्या बाजूने का होईना!

छ बू
दोनच अक्षरं तुझ्या नावाची माहीत
बाकी कधी काही कळलं नाही
मराठवाड्यात तिकडं बीडाकडं
कुठं कोपऱ्यात होतं तुझं गाव

४

तुला रेडिओची लय आवड
पण तुला घेता आला नाही कधी जिंदगीत
तू ऐकायची कान देऊन जिथं असंल रेडू
सिंध्याच्या बेकरीत रेडू वाजू लागला की

छबू, तू हरवून जायची

दोनशे रुपयात टुइन, टेपरेकॉर्डरसहित रेडिओ
तुला इकलाता एका लफंग्यानं
जो खूपच स्वस्त होता नव्याच्या मानानं
तो चोरीचा निघाला नि तू अडकली गुन्ह्यात
मोप छळ केला पोलिसांनी
सात वर्षे चाल्लीती केस त्या टुइनची
शेवटी निर्दोष ठरली
परत तू ऐकला नाही कधी रेडू
थेटरचा सिन्मा पाह्यची अधूनमधून
तोही बंद झाला तुझा

५
एकदा हाती घेऊन पाहिलीती
तुझी पैंजण जोडी
जणू मी उचलत होतो राशनच्या थैल्या
'केव्हढी गं ही जड?'

तू म्हणाली होतीस,
'आमचं पोट आमच्या घोट्यावर बांधलेलं असतं
आमच्या हमालीची कोणाला कल्पना नसती
घुंगरू नाही भाऊ, आमची भूक तिथं वाजत असती!'

तुझे जुने साथीदार हलगी, ढोलकी वाजाप
यायचे डुलतडुलत
जर्मली पातेल्यात बिनदुधाचा 'च्या'
उकळून लावायची वाटी
म्हणायची,
'आपल्या आयुष्याला कोणतीच
रंगत नाही आली दादा!
तमाशाची कलाकेंद्रं...त्याचीच पुढं धंद्याची जागा झाली
बोर्डावरची बाई पांघरुणात आली
याच्यात कशाची कला राह्यली?'

तुझा जातधंदा गायचा-नाचायचा
त्याची बरकत शहरवस्तीच्या लोकांना गेली
नऊवारीतली कला मुर्दाड?
नि दंड-बेबी उघडी सोडणारांची आवक झाली
म्हणे छबू, तू करते ती कलेची घाण
त्यांच्या गाण्याची 'पद्मश्री' झाली!

६
खोली मालकानं बाहेर फेकलं
तू ओक्साबोक्शी रडली
तुझं बिऱ्हाड-बाजलं देत नव्हता आधी
कसंबसं ते मिळालं
नि तुला कधीच बघायचं नव्हतं
त्या कलाकेंद्राचं दार तुला शेवटी बघावं लागलं!

७
एका रात्री उशिरा कलाकेंद्रावर
झाला आरोड
छावणीतून आलेल्या जवानांनी
पोरी उचलून गाडीत घालून न्यायची केल्ती तयारी
तव्हा तुझ्या हाती आला खाटकी सुरा
नि बळही आलं कुठून...
वाचवलं पोरींना!
झटापटीत तू पाडलेस तीन जवानांचे मुडदे
सुरा घेऊन जाऊन बसलीस पोलिस ठाण्यात

तव्हा तुझ्या चोरीच्या आरोपातल्या जप्त टुइनवर
पोलिसपार्टी ऐकत होती लता मंगेशकरचं गाणं
'ऐ मेरे वतन के लोगो
जरा आँख मे भर लो पानी
जो शहीद हुए हैं उनकी
जरा याद करो कुर्बानी'

छबू,
ज्या गाण्याचे भलतेच अर्थ निघत होते त्यावेळी...

**संतोष पद्माकर पवार**
मंचर जि.पुणे
ईमेल santoshpawar365@gmail.com